# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ / आषाढ २७, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(५)** | **मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २६**

---

### मुंबईतील अंधेरी (पश्चिम) 'के' प्रभागातील मोगरा नाल्यावर झालेले अनधिकृत बांधकाम

**(१) * ६७५१२ श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील अंधेरी (पश्चिम) 'के' प्रभागात येणाऱ्या सर्वे क्र. ६५/६६ १-५१ या भुखंडावर झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत मिलेनिअर रियाल्टी व आशियाना को.ऑप.हौ.सोसायटी लि. या इमारतीचे बांधकाम करीत असताना इमारती लगत असलेला मोगरा नाला (मेजर नाला) बंदीस्त करून त्यावर स्लॅब टाकून इमारतीचे बांधकाम करण्यात आले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामामुळे पावसाळ्यात नाल्याची साफसफाई करण्यास अडचण निर्माण होवून जवळच्या रहदारीसाठी मुख्य मार्ग असलेल्या अंधेरी सब-वे मध्ये पाणी साचत असून तेथून रहदारी करणाऱ्या लाखो मुंबईकरांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत असून लगतच्या मासळी बाजारातही पाणी साचून मच्छीमार बांधवांचे लाखो रूपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामाप्रकरणी महानगरपालिकेकडे श्री.शकिल पाटणी यांच्या एन.जी.ओ. ने वेळोवेळी तक्रारी करून देखील त्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित विकासक आणि त्यास सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी तक्रारदारास वेळोवेळी उत्तरे देण्यात आलेली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) येथील बसस्थानकातील छताचे प्लास्टर कोसळून**
**तीन महिला जखमी झाल्याबाबत**

**(२) * ६८१८० श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि. परभणी) येथील बस स्थानकातील छताचे प्लास्टर कोसळून ३ महिला गंभीर जखमी झाल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकाची इमारत ही चाळीस वर्षापेक्षा जुनी असून पावसाळयामध्ये या इमारतीचे छत गळत असूनही येथील प्रशासनाने या इमारतीची दुरुस्ती केली नाही त्यामुळे तेथे मोठी दुर्घटना होऊन जिवीतहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच दुरुस्ती कामात दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०३.०४.२०२३ रोजी छताच्या एका ठिकाणचे प्लास्टर निघून पडल्यामुळे तीन महिला किरकोळ जखमी झाल्या होत्या.

(२) पाथरी बसस्थानकाची इमारत ४१ वर्षे जुनी असली तरी देखील इमारतीची नियमित डागडुजी करण्यात येत असते. ज्या ठिकाणी छताचे प्लास्टर पडलेले आहे त्याच्या आसपासच्या ठिकाणचे प्लास्टर निखळून पडण्याची शक्यता आहे, त्या ठिकाणचे प्लास्टर पाडून टाकण्यात आलेले असून, दुरुस्तीची कार्यवाही चालू आहे. तसेच बसस्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी रक्कम रुपये ५.०० कोटीची तरतूद सन २०२४-२५ मध्ये प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी केली असता तीन महिलांच्या अंगावर प्लास्टर पडले परंतु कोणती गंभीर दुखापत झाली नाही. आगार व्यवस्थापक यांनी याबाबत चौकशी केली असता या महिलांनी खाजगी रुग्णालयात जाऊन तपासणी व उपचार घेऊन परस्पर घरी गेल्या. त्यानंतर त्या महिला किंवा त्यांचे नातेवाईक यांनी आर्थिक मदत मिळणे अथवा तक्रारीसाठी आगारात संपर्क केला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मागासवर्गीय विद्यार्थांसाठी बार्टीमार्फत राबविण्यात येणारे**
**कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुलभपणे सुरू करण्याबाबत**

**(३) * ६४५८१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार**

**(शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) या संस्थेअंतर्गत महाराष्ट्रातील ३० प्रशिक्षण संस्थांमार्फत विविध स्पर्धा परिक्षांच्या सरावासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ५ वर्षांचा कालबद्ध कार्यक्रम आखून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे तसेच ३० प्रशिक्षण संस्थांपैकी १६ जिल्हयात प्रशिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांची निवड न केल्यामुळे प्रशिक्षणाअभावी सुमारे २० हजार विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचे दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तात्काळ चौकशी करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विविध शासकीय स्पर्धा परीक्षांकरिता उत्तमरीत्या सराव व तयारी करण्यासाठी बार्टीमार्फत राबविण्यात येणारे राज्यभरातील कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुलभरीतीने सुरू करणे तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असून यावर नियमित सुनावणी सुरू आहे. सदर प्रकरणी शासनाच्या वतीने राज्याचे महाधिवक्ता बाजू मांडत असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईमधील महानगरपालिका रूग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याने धोका निर्माण झाल्याबाबत**

**(४) * ६६०८५ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालय, नायर रुग्णालय, केईएम रुग्णालय, सायन रुग्णालयासह इतर रुग्णालयांमध्ये मोठ्या संख्येने रूग्ण उपचारासाठी येत असताना या रुग्णालयांमध्ये पुरेशी अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नसून काही ठिकाणी ती कालबाह्य झाली असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई अग्निशमन दलाकडून या रुग्णालयांचे फायर ऑडीट केले असता यात अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या रुग्णालयांमध्ये अद्ययावत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणेसंदर्भात तसेच यासाठी आवश्यक निधी व प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अग्निसुरक्षिततेसंदर्भातील अटी व शर्तींचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांच्या प्रशासनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर रुग्णालयांचे फायर ऑडिट महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ नुसार मान्यताप्राप्त लायसन्स अभिकरण व महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी मान्यता दिलेल्या ऑडिटरद्वारे केले जाते.
मुंबई अग्निशमन दलामार्फत सदर रुग्णालयातील आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना यांची तपासणी केली असता, काही रुग्णालयांत त्रुटी आढळून आल्या आहेत, हे खरे आहे.
(३) रुग्णांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रुग्णालयांत अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या कामासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध असून गरज भासल्यास योग्य ती तरतूद करण्यात येते.
त्याचप्रमाणे रुग्णालयांत अधिकारी / कर्मचारी / कामगार यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत चक्रांकित पध्दतीने वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(४) शासकीय व महानगरपालिकेच्या रुग्णालयांच्या संबंधित प्राधिकृत अधिकारी यांना अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने योजावयाच्या अग्निसुरक्षा उपाययोजनांचे सूचनापत्र देऊन त्रुटींची पूर्तता करण्यास सूचित करण्यात आले आहे व वेळोवेळी अग्निसुरक्षिततेसंदर्भातील अटी / शर्तींचे पालन लवकरात लवकर व्हावे याकरिता रुग्णालय प्रशासनास अवगत केले जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(५) * ६५८९५ श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून काही ठिकाणी अशुद्ध पाणीपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरातील बहुचर्चित समान पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) रस्त्यावरील खडकवासला धरणाच्या परिसरातील नांदेड, कीरकीटवाडी, नांदोशी गावांचा समावेश महानगरपालिकेत झाला असतानाही तेथे जलवाहिन्या टाकण्यात न आल्याने वर्षोनुवर्षे विहिरीवरून पाणीपुरवठा सुरु केल्यामुळे नागरिकांना शुद्ध पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असून, अनेक भागात चढ्या दराने टॅंकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त गावांमध्ये अशुद्ध पाणी पुरवठ्यामुळे साथीचे आजार, कावीळ व मुतखडा यासारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढला असून यावर पुणे महानगरपालिका प्रशासनामार्फत कोणत्याही प्रकारची प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणी प्रश्न लवकर सोडविणे, स्वच्छ पाणीपुरवठा करणे, समान पाणी पुरवठा योजना तात्काळ पूर्ण करणे, टँकरमाफियांवर नियंत्रण आणणे, पाणीपुरवठा योजनेचे काम पुर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर तसेच या संपुर्ण प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, तसेच अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे होणाऱ्या आजारांवर नियंत्रण आणण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे अंशत: खरे आहे. तथापि, काही ठिकाणी अस्वच्छ पाणीपुरवठा होत आहे, ही बाब खरी नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट २३ गावांपैकी नांदेड, किरकीटवाडी व नांदोशी या गावांना ३००० मी.मी. व्यासाच्या लाईनमधून ग्रामपंचायत काळात अस्तित्वात असलेल्या नांदेड विहीर येथे पाणी (raw water) घेण्यात येऊन, या पाण्यामध्ये ब्लिचींग पावडरचे द्रावण तयार करून टाकण्यात येऊन, सदर गावांमध्ये अस्तित्वात असलेल्या वितरण व्यवस्थेमधून पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(४) हे खरे नाही.

नांदेड, किरकिटवाडी व नांदोशी या गांवाकरीता प्रक्रिया न केलेले पाणी (raw water) अस्तित्वातील ग्रामपंचायतींच्या विहिरीमध्ये घेण्यात येते. या गावांतील नागरिकांना साथीचे रोग होऊ नयेत म्हणून पाणी पुरवठा विभागामार्फत अस्तित्वातील विहिरीमध्ये आवश्यक त्या प्रमाणात ब्लिचींग पावडरने निर्जंतुकीकरण करून परिसरातील नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(५) पुणे महानगरपालिकेमार्फत नव्याने समाविष्ट ११ व २३ गावांकरीता पाणीपुरवठा करण्यासाठी सविस्तर डी.पी.आर. करण्याचे कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील सिडको भागात अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत

**(६) * ६७८२६ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील सिडको भागात एकही अत्याधुनिक रुग्णालय नसल्याने कामगार वर्गासह सिडकोवासियांना उपचारासाठी महानगरपालिकेच्या नाशिक रोड येथील बिटको रुग्णालय, जिल्हा शासकीय रुग्णालय किंवा खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्यामुळे स्थानिकांची फार गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मोरवाडी, जुने सिडको, पिंपळगाव खांब, कामटवाडे व अंबड या चार शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये केवळ बाह्यरुग्ण तपासणी केली जात असून तेथे २४ तास वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांना आवश्यक ते उपचार व सोयी-सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिडकोवासियांकरीता अत्याधुनिक सर्व सोयी-सुविधांयुक्त रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ५ लाखांपर्यंतच्या लोकसंख्येकरीता एक मोठे रुग्णालय (UCHC) व प्रत्येक ५० हजार लोकसंख्ये मागे ०१ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र असणे अपेक्षित आहे. त्यानुसार नाशिक शहरात एकुण ५ मोठे रुग्णालय व ३० शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र सद्यस्थितीत कार्यरत आहे. सदर ठिकाणी उपलब्ध मनुष्यबळांद्वारे व राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्शक सुचनांनुसार बाह्यरुण सेवा आणि इतर सेवा देण्यात येत आहेत.

सिडको परीसरात राहणाऱ्या नागरिकांसाठी वैद्यकिय सुविधा मिळण्याचा दृष्टीने जवळ असणारे महानगरपालिकेचे १) श्री स्वामी समर्थ रुग्णालय, मोरवाडी २) डॉ.झाकीर हुसैन रुग्णालय, कथडा ३) मायको दवाखाना, सातपुर असे ३ दवाखाने कार्यरत आहेत. तसेच याव्यतिरिक्त १) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे स्थापन करण्यात आलेले ‘ईएसआय हॉस्पीटल’ २) शासनाचे जिल्हा रुग्णालय, नाशिक व ३) संदर्भ सेवा रुग्णालय हे देखील जवळ आहेत. सदर रुग्णालयामार्फत रुग्णांना आवश्यक ते उपचार व सोयीसुविधा देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिका रुग्णालयांकरिता खरेदी करण्यात येणाऱ्या औषध खरेदीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) * ६५२९४ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका रुग्णालयाकरिता औषध खरेदीमध्ये हजारो कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची लेखी तक्रार फूड अँड ड्रग लायसन्स होल्डर फाउंडेशन चे अध्यक्ष श्री.अभय पांडे यांनी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ.संजीव कुमार यांच्याकडे दिनांक २५ एप्रिल २०२३ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महापालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्याकडून गतवर्षी (सन २०२२ मध्ये) ‘शेडयुल्ड-२’ अंतर्गत सन २०२२-२०२४ या वर्षासाठी गोळया आणि कॅप्सूल खरेदी संदर्भात निविदा काढण्यात आली असून, यामध्ये तापावरील पॅरासिटेमॉल, मेटफॉर्मिन, अॅमलोडिपीन, अॅट्रोव्हेस्टा, पँटोप्राझोल व डॉक्सीसायक्लिन या औषधांचा समावेश असल्याची बाब माहिती अधिकाराच्या माध्यमातून माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू औषध कंत्राट मिळण्यासाठी निविदा प्रक्रियेत चंदीगडच्या औषध उत्पादक कंपनीने बनावट कागदपत्रे सादर केल्याचा प्रकार निदर्शनास आल्यानंतर कंपनीला निविदा प्रक्रियेतून बाद करून त्याच्याविरोधात मध्यवर्ती खरेदी खात्याकडून एफआयआर दाखल होणे आवश्यक असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून सदर कंपनीला निविदा प्रक्रियेत कायम ठेवण्यात आल्याचा आरोप ‘ऑल फूड अॅण्ड ड्रग लायसन्स होल्डर फाउंडेशन’ कडून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये आणि रूग्णालयांत औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून रुग्णांना बाहेरुन चढ्या दराने औषध खरेदी करावी लागते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करुन महानगरपालिकेतील रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) रुपये १०० कोटीपेक्षा जास्त रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस ई-मेलद्वारे प्राप्त झाली आहे.
(२) अशा आशयाचा माहिती अधिकार अर्ज माहे मे, २०२३ वा त्या दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यास प्राप्त झालेला नाही.

माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये अनुसूची-२ वरील औषधांमध्ये पॅरासिटेमॉल, मेटफॉर्मिन, अॅमलोडिपीन, अॅट्रोव्हेस्टा, पँटोप्राझोल, डॉक्सीसायक्लिन व इतर औषधांचा समावेश करण्यात आला आहे व अनुसूची-२ वरील औषधांकरिता औषध उत्पादक व पुरवठादार यांची नियुक्ती माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये करण्यात आली आहे.
(३) सदर कंपनीला काळ्या यादीत न टाकल्याबाबतचा तक्रार अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

तथापि, माहे जुलै, २०२२ मध्ये सदर कंपनीला निविदा प्रक्रियेतून बाद करुन त्यांचेकडून रुपये ६ लाख इतकी अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच सदर कंपनीला काळ्या यादीत टाकण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत औषध अनुसूची-२ वरील औषधांकरिता निविदा प्रक्रिया राबवून प्रतिसादात्मक औषध उत्पादक व पुरवठादार यांची दोन वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली असून, सदर औषधांच्या तुटवड्याबाबत प्रश्न उपस्थित होत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाबाबत**

**(८) * ६४६२४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.शंकरराव गडाख (नेवासा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच जिल्ह्यात माहे एप्रिल-मे, २०२३ मध्ये सातत्याने अवकाळी पाऊस, वीज पडणे, गारपीट, वादळी वारे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या जनावरांचे, पिकांचे, शेतीचे, फळबागांचे आणि स्थावर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान तसेच मनुष्यहानी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी व विज पडून अनेक व्यक्तींचा दुर्देवी मृत्यू झाला असून कित्येक व्यक्ती गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बहुतांश जिल्ह्यात अद्याप सदर नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्यात आले नसून, नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वेळेत मिळत नसल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेती नुकसानीचे पंचनामे उपग्रहाव्दारे (ई पंचनामे) करण्याबाबत शासनाने निर्णय माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(५) तसेच राज्यात सन २०२१-२२ या कालावधीत अतिवृष्टीमुळे अनेक भागात झालेल्या नुकसानीकरिता रुपये ५४३९.०७ कोटी इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मान्यता दिली असून, यासंदर्भातील प्रलंबित अनुदान शासनाने दिनांक ५ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे वितरीत केले असतानाही राज्यातील कित्येक भागात अद्यापही नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त नुकसानीच्या नोंदी मोबाईल ॲपवर करण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्मार्टफोनची अनुपलब्धता, संगणक वा मोबाईल वापराचे अज्ञान, इंटरनेटचा अभाव यामुळे नोंदीअभावी राज्यातील हजारो शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहणार असल्याने सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देखील तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन गत वर्षातील व या वर्षातील नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी व वस्तुनिष्ठ पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तातडीने मिळण्याबाबत तसेच मृत व्यक्तींच्या वारसांना तातडीने मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) राज्यात एप्रिल, मे-२०२३ मध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे मुख्यत्वे शेती पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.
(२) राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे मार्च ते मे, २०२३ या कालावधीत एकूण ९५ इतक्या व्यक्तींचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) नाही.
(४) नाही, ई-पंचनामा कार्यप्रणाली पूर्णपणे विकसीत झालेली नसल्यामुळे त्याची अद्याप अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली नाही.
(५) अतिवृष्टी, पूर यामुळे पावसाळी हंगाम २०२१ व पावसाळी हंगाम, २०२२ मध्ये झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता अनुक्रमे रुपये ४८२५९२.९९ लक्ष व रुपये ७९५२७७.९८ लक्ष इतका निधी विभागीय आयुक्त यांच्या मागणीनुसार वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. तथापि, सन २०२१ व २०२२ मधील काही प्रलंबित प्रस्तावाबाबत मागणी असल्यामुळे शासन निर्णय महसुल व वन विभाग दिनांक ०५.०६.२०२३ अन्वये रुपये ४०१७०.७० लक्ष इतक्या निधी वितरणास मान्यता देण्यात आली आहे.
(६) शेती पिकांच्या नुकसानीच्या नोंदी अद्याप मोबाईल ॲपद्वारे करण्यात येत नसल्याने कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(७) महसुल व वन विभागाच्या दिनांक ०५.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी वितरणास दिलेल्या मान्यतेप्रमाणे मदतीची रक्कम थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसांना सानुग्रह सहाय्यची रक्कम प्रदान करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडको आस्थापनेत नियुक्ती नसताना १४ कर्मचाऱ्यांची समन्वयक व सल्लागार पदावर नियुक्ती केल्याबाबत

**(९) * ६४६३८ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको आस्थापनेत कायमस्वरूपी किंवा कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाली नसताना देखील १४ कर्मचाऱ्यांची समन्वयक व सल्लागार पदावर सिडको अधिकाऱ्यांच्या संगनमताने सन २०१७ पासून नियुक्ती दाखवून वेतनापोटी सुमारे तीन कोटी रुपयांची रक्कम आहरीत करुन शासनाची फसवणूक केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) दक्षता तपास अधिकारी, सिडको यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीअंती सन २०१७ पासून एकूण २८ व्यक्तींच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे वेतनापोटी रु. २,८१,९३,४८४/- अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

यासंदर्भात श्री.सागर तपाडिया, सहाय्यक विकास अधिकारी, कार्मिक विभाग, सिडको यांनी गुन्हा कबुल केल्यानुसार त्यांना दिनांक १३.४.२०२३ रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच श्री.सागर तपाडिया यांच्यावर बेलापूर पोलीस ठाणे येथे एफआयआर क्र. ७५/२०२३ अन्वये भा.द.वि. १८६० च्या कलम ४२०, ४०९, ४६५, ४६८, ४७१ व ४७४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पारस (ता.बाळापूर, जि.अकोला) येथे झाड कोसळून सात भाविकांचा झालेला मृत्यू

**(१०) * ६४८४७ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारस (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील समर्थ बाबुजी महाराज मंदिरात अनेक भाविक दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी दर्शनासाठी आले असता अचानक पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पत्र्याच्या शेडच्या खाली उभे असलेल्या अनेक भाविकांवर मोठा वृक्ष कोसळून झालेल्या दुर्घटनेत ७ भाविकांचा जागीच मृत्यु तसेच २९ व्यक्ती गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या दुर्घटनेतील मृत व जखमींच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) मौजे पारस ता. बाळापूर, जि. अकोला येथे झालेल्या दुर्घटनेमध्ये ८ व्यक्तींचा मृत्यू झाला असून २९ व्यक्ती गंभीर जखमी झाल्या आहेत.

जिल्हाधिकारी अकोला मार्फत सदर घटनेमध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी ४.०० लक्ष आर्थिक मदत वाटप करण्यात आली आहे. तसेच सदर दुर्घटनेमध्ये गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीना रुपये १ लक्ष ७२ हजार इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील एस.टी. बसस्थानकांची झालेली दूरवस्था

**(११) * ६६१६२ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.रविशेठ पाटील (पेण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एस.टी. महामंडळाच्या बसस्थानकांमध्ये अत्यावश्यक असणाऱ्या सोयी सुविधा पुरविण्यात येत नसल्यामुळे तसेच बस स्थानकांची दुरवस्था झाल्यामुळे प्रवाशांची तसेच विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषत: फैजपूर (ता.यावल, जि.जळगाव), लोणार (जि.बुलढाणा), चाकूर (ता.चाकूर, जि.लातूर), वसमत (जि.हिंगोली), मुंबई सेंट्रल, परळ व कुर्ला अशा अनेक ठिकाणी एस.टी. स्थानकांत स्वच्छता गृहे, पंखे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था तसेच सुरक्षितता इ.सोई सुविधा नसल्याचे तसेच बस स्थानकांची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मेहकर आगारात (जि.बुलढाणा) वाहक नसल्याने मादणी, बेलगांव, गोहगाव, पांगरखेड, विठ्ठलवाडी या गावातील विद्यार्थ्यांची व प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रवाशांना पिण्याचे पाणी नसल्याने नाथजल चढ्या दराने विकत घ्यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन राज्यातील एस.टी. स्थानकांमध्ये सर्व सोईसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.

(३) नाही.

मेहकर आगारात (जि.बुलढाणा) चालनीय नियतानुसार वाहक पदाची मंजूरी १६७ असून १५८ कर्मचारी कार्यरत आहेत व ९ पदे रिक्त आहेत.

(४) नाही.

प्रवाशांना रुपये १५/- मध्ये १००० मि.ली. नाथजल व रुपये ९/- मध्ये ५०० मि.ली. नाथजल पाणी बाटली विक्रीसाठी उपलब्ध असल्याबाबत प्रदर्शित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वमग्न (ऑटिझम) मुलांच्या बौध्दिक व कौशल्य विकासाकरिता आरोग्य, मानसिक व शैक्षणिक पातळीवर सर्वसमावेशक समिती तयार करण्याबाबत

**(१२) * ६८२५७ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगाच्या यादीत समावेश झालेल्या "स्वमग्न" (ऑटिझम) मुलांची संख्या मोठ्या प्रमाणात असतानाही यांच्या उपचारासाठी मुंबईखेरीज राज्यात अन्यत्र कुठेही शासकीय थेरपी सेंटर नसल्याचे व कोरोना काळानंतर त्यावर उपचार करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाही बंद झाल्याचे तसेच या मुलांच्या शिक्षणासाठी राज्यात एकही सरकारी विशेष शाळा (Special School) नसल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या "स्वमग्न" मुलांचा बौध्दिक व कौशल्य विकास तसेच गती येण्यासाठी शासकीय थेरपी सेंटर्स, शिक्षणासाठी विशेष शाळा, "स्वमग्न" तसेंच इतर दिव्यांग प्रकारासाठी प्रशिक्षक तयार करुन अभ्यासक्रम तयार करण्याची व या मुलांच्या स्वमग्नतेचे प्रमाणपत्र देताना शासकीय पातळीवर आरोग्य, मानसिक आणि शैक्षणिक पातळीवर सर्वसमावेशक समिती तयार करण्यात यावी इत्यादी स्वरुपाच्या मागण्या त्यांच्या पालकांनी शासनाकडे केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वमग्न मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तथापि, बौध्दिक अक्षम मुलांसाठी २९७ विशेष शाळा असून १४,५४० इतके प्रवेशित शिक्षण व प्रशिक्षण घेत आहेत. तसेच सदर प्रवेशितांना थेरपी सुविधा पुरविल्या जातात.

(२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) परिसरात रस्त्यावरचा जाहिरात फलक कोसळून झालेल्या अपघातात पाच जणांचा झालेला मृत्यू

**(१३) * ६४५९६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) परिसरातील किवळे येथील महामार्गाजवळील कात्रज-देहू रोड सर्व्हिसरोडच्या कडेला वादळीवारे व पावसामुळे रस्त्यावरील भलेमोठे जाहिरात फलक (होर्डिंग) ८ जणांच्या अंगावर कोसळून त्यात ५ जणांचा जागीच मृत्यू व ३ जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना शासनाकडून ३ लाख रुपये मदत करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी करुनही अद्याप मदत मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच माहे मे-जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान हिंजवडी-पुणे येथेही वादळी पावसात होर्डींग्ज पडल्याचे निदर्शनास आले असून, पुण्यात २६२९ अनधिकृत तर २४८५ अधिकृत जाहिरात फलक असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच नाशिक महानगरपालिका हद्दीत ८४५ जाहीरात फलक (होर्डिंगधारक) लावलेले असून या जाहिरात फलकांचे महानगरपालिकेच्या परवाने नुतनीकरण व मिळकत विभागाने स्ट्रक्चरल ऑडीट केले नसल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम, २००३ च्या इलेक्ट्रॉनिक जाहिरात नियमावलीचे पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये सर्रास उल्लंघन सुरु असल्याने डिजिटल व बेकायदेशीर होर्डिंगची संख्या वाढत आहे व या होर्डिंगच्या दृश्यमानतेमुळे अपघात घडत असतांना अपघात टाळण्यासाठी महानगरपालिका प्रशासनामार्फत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने सदर घटनांची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अधिकृत व अनधिकृत जाहिरात फलक (होर्डिंग) यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करुन मृत्यूमुखी पडलेल्या तसेच जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या एकूण ५ व्यक्तींच्या वारसांना अपर तहसिल कार्यालय, पिंपरी चिंचवड, ता.हवेली, जि.पुणे यांचेकडून प्रत्येकी रूपये ३ लाख याप्रमाणे मदत देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये एकूण २४८५ अधिकृत जाहिरात फलक असून दिनांक ०१.०४.२०२२ ते दिनांक ३०.०६.२०२३ अखेर एकूण १३६९ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनांची कारवाई करण्यात आलेली असून उर्वरित बाबत कार्यवाही सुरू असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) हे खरे नाही.

महानगरपालिकेने सुरक्षिततेच्या दृष्टीने खाजगी संस्थेमार्फत माहे एप्रिल, २०२३ पासून स्ट्रक्चरल ऑडीटचे काम हाती घेऊन ते माहे जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात आलेले असल्याचे नाशिक महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(५) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात व फलक नियंत्रण नियम, २००३ व जाहिरात फलक नियमन व नियंत्रण नियम, २०२२ मधील नियमावलीतील तरतूदींनुसार इलेक्ट्रॉनिक जाहिरातींना परवानगी दिली जाते.

पुणे महानगरपालिकेकडील १५ क्षेत्रीय कार्यालयनिहाय अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, झेंडे इ. वर दैनंदिन स्वरूपात निष्कासन कारवाई करण्यात येत असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.

(६) पिंपरी चिंचवड हद्दीत घडलेल्या दुर्घटनेबाबत जबाबादार जाहिरात फलक धारक, संबंधित जागा मालक व जाहिरात फलक चालक यांच्याविरूध्द रावेत पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र.०१८५, दिनांक १८.०४.२०२३ अन्वये दाखल करण्यात आलेली आहे.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या एकूण ५ व्यक्तींच्या वारसांना अपर तहसिल कार्यालय, पिंपरी चिंचवड, ता.हवेली, जि.पुणे यांचेकडून प्रत्येकी ३ लाख याप्रमाणे मदत देण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड शहरात घडलेल्या दुर्घटनेच्या अनुषंगाने अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासनाची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत तसेच सदर घटनेची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना दिनांक ०२.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिका आयुक्तांना देण्यात आलेल्या आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घोडबंदर (जि.ठाणे) येथे उभारण्यात आलेल्या थीमपार्कच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१४) * ६७०४४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर येथील घोडबंदर परिसरात ठाणे महानगरपालिकेने एक थीम पार्क उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामातील कंत्राटदाराने शासनाची लाखो रुपयांची रॉयल्टी बुडवून आर्थिक गैरव्यवहार केल्यामुळे ठेकेदारांची बँक गॅरंटी जप्त करण्यात आल्याचे दिनांक १४ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गतवर्षाच्या अर्थसंकल्पात थीम पार्क उभारण्यासाठी २ कोटीच्या वाढीव तरतुदीसह ४ कोटींची नवी तरतूद करूनही हे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर कामास वारंवार मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, एकूण सोळा कोटी रुपयांच्या या कामातील तेरा कोटी रुपयांची देयके ठेकेदाराला काम पूर्ण न होता अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन काम वेळेत पूर्ण न करणारा कंत्राटदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे शहरातील मौजे चितळसर मानपाडा, घोडबंदर येथे जुने ठाणे-नवीन ठाणे थीम पार्क विकसित करण्यास ठाणे महानगरपालिकेने मंजुरी प्रदान केली असल्याची वस्तुस्थिती आहे.
(२) सदर कामांअंतर्गत शासनास ठेकेदारामार्फत रॉयल्टी रक्कम जमा केली नसल्याने ठेकेदाराची रुपये ३२.७० लक्ष प्राथमिक सुरक्षा अनामत रक्कमेची बँक गॅरंटी जप्त करुन या रक्कमेतून रुपये १५.०४ लक्ष रॉयल्टी शासनास दिनांक १६.०२.२०२२ रोजी जमा केल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(३), (४) व (५) उपरोक्त कामांअंतर्गत दिनांक २०.१२.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या रुपये १६.३५ कोटी रकमेच्या कार्यादेशानुसार सदर कामाची मुदत २ वर्षे (पावसाळा वगळून) होती.

ठाणे महानगरपालिकेच्या अहवालानुसार सदरचे काम दिनांक १२.०३.२०१८ रोजी भौतिक दृष्ट्या सर्वोतोपरी पुर्ण झाले असून ठेकेदारामार्फत पुर्ण करण्यात आलेल्या कामांचे रुपये १०.८१ कोटी रकमेचे देयक अंतिम करण्यात आले आहे.
(६) सदर कामाच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या स्तरावर सन २०१८ मध्ये गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीमार्फत देण्यात आलेल्या शिफारशीनुसार सदर प्रकल्पाच्या सबंधित अधिकाऱ्यांविरुध्द महानगरपालिकेच्या दिनांक ११.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये विभागीय चौकशी करण्यात येत असून सद्यस्थितीत सदर चौकशी सुरू असल्याची बाब महानगरपालिकेने कळविले आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सारसंग (ता.खालापूर, जि.रायगड) गावाच्या हद्दीतील सांडपाणी पाताळगंगा नदीत सोडल्याने प्रदूषणात होत असलेली वाढ

**(१५) * ६५२६४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश**

**अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारसंग (ता.खालापूर, जि.रायगड) गावाच्या हद्दीतून मुंबई-पुणे एक्सप्रेसवरील फुडमॉल, हॉटेल्स व पेट्रोल पंपामार्फत टाकण्यात येणारा घनकचरा, टाकावू अन्नपदार्थ, प्लास्टीक व अन्य कचरा जाळण्यासाठी ठेकेदारांकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी नसल्यामुळे छुप्या पध्दतीने सदरहू कचरा व सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता रात्रीच्या वेळेस पाताळगंगा नदीत सोडल्यामुळे प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष यांनी दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागाकडून कारवाई होत नसल्यामुळे प्रदूषणात वाढ होऊन दुर्गंधी पसरल्यामुळे परिसरातील नागरीक व नदीतील जलचर प्राण्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित फुडमॉल, हॉटेल व पेट्रोलपंपाचे व्यवस्थापक तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, पाताळगंगा नदीपात्र प्रदूषणमुक्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, दिनांक २४.०४.२०२३ रोजी भ्रमणध्वनीव्दारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(३) व (४) हे खरे नाही, तथापि, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी स्थळ पाहणी करुन आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मे.ओशन हायवे फॉसिलिटिज व सोलूशन प्रा.लि. (फुडमॉल) यांना दिनांक ०२/०२/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस तसेच दिनांक ०४/०७/२०२३ रोजी प्रस्तावित आदेश बजावण्यात आलेले आहेत.

(५) नदी प्रवाहामध्ये प्रदूषित पाणी जाऊ नये यासाठी नदीकाठावरील उदयोगांना वेळोवेळी भेटी देऊन पाहणी केली जाते व पाहणी दरम्यान योग्य ती उपायोजना, खबरदारी घेण्याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/उदयोग यांना सूचित केले जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील हवेचे आणि धुळीचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) * ६५६५३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती**

**प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांधकामे व इतर विकासकामांमुळे निर्माण होणाऱ्या धुळीमुळे प्रदूषण वाढत असून सदर प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने आणि महानगरपालिकेने एक कृती आराखडा तयार केला असून दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजीपासून आराखड्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मात्र सदरच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्स अहवालानुसार जगातील सर्वात जास्त हवा प्रदूषण असणाऱ्या २० शहरांपैकी १४ शहरे ही भारतातील असून त्यामध्ये राज्यातील विशेषत: भिवंडीचाही समावेश असून, कारखाने, वाहनांचा धूर, बदलत्या वातावरणामुळे होणारे हवा प्रदूषण इत्यादी कारणामुळे प्रदूषण वाढ होत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात ११ हजार २१५ बांधकामे सुरु असून सदर बांधकामाच्या ठिकाणी धुळरोधक पडदे व पत्रे लावले जात नसल्यामुळे प्रदुषणात मोठया प्रमाणात भर पडत आहे आणि दूषित हवेमुळे नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील हवेचे प्रदूषण, धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी मुंबई महापालिकेच्या सात सदस्य समितीने शिफारस केली आहे. महानगरपालिकेने कृती आराखडा तयार करुन प्रत्येक वॉर्डात धुळ नियंत्रणासाठी कृती दल स्थापन करण्याच्या सूचना देऊनही अद्याप कृती दले स्थापन करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच मुंबईतील वाढत्या प्रदूषणानंतर धूळ नियंत्रित करण्यासह विविध उपाययोजना करण्यासाठी मुंबई महापालिकेच्या २४ वॉर्ड स्तरावर कृती दलाच्या स्थापनेसह समिती घटित करुन धुळ नियंत्रित करण्याकरीता विविध उपाययोजना करण्यात येणार असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मुंबईतील वाढत्या प्रदूषणावर तोडगा काढणाऱ्या समितीने उपहारगृह व ढाब्यातील तंदुरच्या कोळशांमुळे प्रदूषणात मोठया प्रमाणात भर पडत असल्याचे अधोरेखित केले असून सदर समितीने आपला अहवाल मा.आयुक्त, महानगपालिका यांना सुपूर्द केला असून, सदर अहवालातील शिफारशींचा अवलंब करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी कृती दल स्थापन करणे आणि कृती आराखडा अंमलात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबई शहरातील वाढते वायु प्रदुषण तात्काळ नियंत्रित आणण्यासाठी मुंबई वायु प्रदुषण निर्मुलन आराखडा तयार करण्यात आला असून, सदर आराखड्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून होण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत.

(२) वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्स अहवालानुसार प्रदुषित शहरांपैकी भिवंडी (महाराष्ट्र) नसून ते भिवडी (राजस्थान) आहे.

भिवंडी शहरात हवा गुणवत्ता सर्वेक्षणाकरिता Continuous Ambient Air Quality Monitoring Station भिवंडी महानगरपालिकेच्या कोंडवाडा येथे कार्यरत आहे. तसेच अतिरिक्त तीन ठिकाणी Ambient Air Quality Monitoring Station द्वारे सर्वेक्षणाचे काम सुरु असून हवा गुणवत्ता मानांकन प्रदर्शित करण्यात येतात. त्यानुसार भिवंडी शहरातील प्रदुषण पातळी मॉडरेट स्वरुपाची असल्याचे निदर्शनास येते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नवीन बांधकामास परवानगी देतांना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील कलम १२ (५) अन्वये बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी बांधकाम सुरु असतांना कोणताही प्रादुर्भाव होऊ नये याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मालक / विकासक तसेच त्यांनी नियुक्त केलेल्या व्यावसायिक यंत्रणा यांची असते.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कामे करतांना विकासकास अमान्यतेची सूचना देतांना त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे विविध अटींचा समावेश करण्यात येतो:-

• इमारत पाडण्यापूर्वी भूखंडाच्या सीमारेषेलगत धुळीचा उपद्रव टाळण्यासाठी पुरेशा उंचीपर्यंत जी.आय. पत्रे उभे करावेत.

• हवेतून विसर्जित होणारे धुळीचे कण रोखण्यासाठी घन कचरा विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपाययोजना करण्यात यावी, तसेच इमारत पाडल्यामुळे होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट महापालिकेने ठरविलेल्या व मंजूर केलेल्याच ठिकाणी लावावी.

• इमारत पाडल्यामुळे तयार होणारा मलबा / कचरा हा "बांधकाम आणि विनाश कचरा नियम-२०१६" या नियमावलीअन्वये विल्हेवाट लावण्यात यावी.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयांत धुळ नियंत्रणासाठी कृती दलांची स्थापना करण्यात आली आहे.

(५) हे खरे आहे.

(६) मुंबई शहर आणि उपनगरातील वाढत्या वायु प्रदुषणावर तोडगा काढण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व विभाग स्तरावर कृती दलाची स्थापना केली असून, सदर कृती दलाला विभागातील उपहारगृहे व धाब्यातील कोळशांवर आधारीत तंदूर वापराबाबत पाहणी करुन संबंधितांना चेतावणी देणे, दंडात्मक कार्यवाहीबाबत सूचना देणे व दंड आकारणे इत्यादींबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अंतर्गत उपहारगृहांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून परवाना देताना मुंबई अग्निशमन दलाकडून अग्निसुरक्षा प्रमाणपत्र देण्यात येते. सदर अग्निसुरक्षा पूर्तता प्रमाणपत्र देतांना अग्निसुरक्षेच्या दृष्टीकोनातून वापरण्यात येणाऱ्या इंधनाचा साठा, वापर इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातात.

(७) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई वायु प्रदुषण निर्मुलन आराखडा तयार करण्यात आला असून, सदर आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी तीन कृती दलांची स्थापना करण्याबाबत सर्व विभागांना कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने विभागस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत मुंबईतील हवेचे प्रदुषण कमी करण्यासाठी विविध तंत्रज्ञानावर आधारीत हवा शुध्दीकरण यंत्रणा व्यावसायिक सामाजिक जबाबदारी निधीचा वापर करुन प्रायोगिक तत्वावर स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर प्रक्रियेत बृहन्मुंबई महानगरपालिका समन्वयाची भूमिका पार पाडत आहे.

-----------------

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नौपाडा कोपरी येथील अमर टॉवर इमारतीचा स्लॅब कोसळून अनेक रहिवासी गंभीर जखमी झाल्याबाबत**

**(१७) * ६४६०६ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नौपाडा कोपरी येथील भास्कर कॉलनीतील अमर टॉवर या सात मजली इमारतीच्या पहिल्या मजल्याचा स्लॅब कोसळून अनेक रहिवासी गंभीर जखमी झाल्याची दुर्घटना दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ४२९७ इमारती धोकादायक स्थितीत असून कळवा प्रभाग समिती क्षेत्रात १७३ तर मुंब्रा प्रभागामध्ये १३४० इमारती धोकादायक स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यातील ८६ इमारती अतिधोकादायक असल्याने प्रशासनाने घरे रिकामी करण्याच्या नोटीस संबधित रहिवाश्यांना दिनांक २० मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाशांची सुरक्षितता, स्थलांतरण तसेच सदर धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील नौपाडा-कोपरी प्रभाग कार्यक्षेत्रातील अमर टॉवर या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिकेचा सिलींग स्लॅब दिनांक १५.०५.२०२३ रोजी कोसळल्याची घटना घडली ही वस्तुस्थिती आहे.

उपरोक्त दुर्घटनेत या सदनिकेतील ३ व्यक्ती जखमी झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ नुसार ठाणे शहर क्षेत्रात सी-१, सी-२ए, सी-२बी, सी-३ या विविध प्रवर्गाखाली एकूण ४२९७ इमारती धोकादायक स्थितीत आहेत. त्यामध्ये कळवा प्रभागातील १७३ व मुंब्रा प्रभागातील १३४० इमारतींचा समावेश आहे.

उपरोक्तपैकी सी-१ प्रवर्गातील (अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे) ८६ इमारतींना ठाणे महानगरपालिकेने नोटीसा बजाविल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(४) राज्यातील नागरी क्षेत्रातील जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत कार्यवाही करण्याकरिता शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतींच्याबाबतीत उक्त मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत असून अशा इमारतींमधील रहिवाश्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून, पर्यायी सोय उपलब्ध नसल्यास अशा रहिवाशांचे तात्पुरते पुनर्वसन महानगरपालिकेच्या शाळेत किंवा इतर ठिकाणी संक्रमण शिबिरात करण्यात येते.

तसेच ठाणे महानगरपालिका हद्दीतील धोकादायक व इतर इमारतींचा पुर्नविकास करण्यासाठी क्लस्टर योजना राबविण्यास शासनाने मंजुरी प्रदान केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे व पिंपरी चिंचवड शहरात यूएलसी कायद्यांतर्गत सवलत घेतलेल्या ७० कंपन्यांनी हस्तांतरण शुल्क बुडविल्याबाबत

**(१८) * ६६२४३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी चिंचवड शहरात यूएलसी कायद्यांतर्गत सवलत घेतलेल्या ७० कंपन्यांनी १०० कोटीहून अधिक रकमेचे हस्तांतरण शुल्क बुडविले असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील यूएलसी कायद्यांतर्गत कलम २० द्वारे सवलत दिलेल्या जमिनींचा झोन बदलताना रेडीरेकनर १५ टक्के हस्तांतरण शुल्क न भरताच ७० कंपन्यांनी जमिनीचा निवासी वापर सुरु केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये तपासणी केली असता एरंडवणे व कोथरूडसह इतर भागातील कंपन्यांचा यात समावेश असतानाही संबंधित कंपन्यांवर फक्त नोटीसा न बजावता गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता असतांना तशी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन हस्तांतरण शुल्क वसुली तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम २० अन्वये विविध प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमीनींबाबत शासन निर्णय दिनांक १.८.२०१९ अन्वये सर्व समावेशक धोरण निश्चित केले असून, सदर शासन निर्णयानुसार औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या प्रकरणी सूटीच्या आदेशामध्ये नमूद एकूण क्षेत्रासाठी (कोणत्याही वजावटीशिवाय आदेशामध्ये नमूद असलेले महत्तम क्षेत्र) प्रचलित वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यामधील दराच्या १५% दराने येणारे अधिमूल्य एकरकमी आकारून असे क्षेत्र संबंधित विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकसनासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे यांचेकडून पुणे नागरी समूहामध्ये नाजकधा कलम २० अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. सदर आढाव्याअंती पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व तळेगाव दाभाडे नगरपरिषद यांनी अनुक्रमे ५३, १४ व १ अशा एकूण ६८ प्रकरणांमध्ये नाजकधा कलम २० अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या क्षेत्रावर वापर बदलासाठी विकसन परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने सदरच्या कंपन्यांना आवश्यक कागदपत्रांसह शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०१९ नुसार अधिमूल्य भरण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत अथवा लेखी खुलासा सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे कार्यालयाने सन २०२१ मध्ये नोटिस बजावलेल्या आहेत. सदर नोटिसा दिल्यानंतर ६ प्रकरणांमध्ये साधारणतः रूपये २९.३७ कोटी इतक्या अधिमुल्याची रक्कम शासनास प्राप्त झाली आहे.

(३) व (४) नाजकधा कलम २० खाली औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या आदेशातील अटी व शर्तींचे उल्लंघन झालेल्या प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे स्तरावर सुनावणी घेऊन, प्रकरणपरत्वे शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०१९ नुसार निश्चित होणारी अधिमुल्याची रक्कम परिगणीत करून, त्याबाबत संबंधितांना जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी स्तरावर नोटिशींद्वारे कळविण्यात येईल. तथापि, संबंधितांनी

अधिमूल्य भरणा न केल्यास त्यांच्या मिळकतपत्रिकेवर अधिमूल्याच्या रकमेचा बोजा दाखल करण्याची कार्यवाही करण्याबाबत दक्षता घेण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.
तसेच शासन स्तरावरून दिनांक २८.११.२००७ नंतर देण्यात आलेल्या सूचना तसेच विविध शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली धोरणे विचारात घेऊन शासनाच्या महसुलाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेऊन निर्णय घेण्याबाबत तसेच संदिग्धता असल्यास शासनाची मान्यता घेऊन कार्यवाही करण्याबाबत सर्व नागरी समुहांच्या जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी व संबंधित महानगरपालिकेचे आयुक्तांना यापूर्वीच शासन परिपत्रक दिनांक २८.४.२०२२ अन्वये निदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंत्री देशमुख (जि.बुलढाणा) या गावातील पैनगंगा नदी ओलांडून जात असताना महिलेचा झालेला मृत्यू**

**(१९) * ६६४२७ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील अंत्री देशमुख या गावातील शेतकऱ्यांना पैनगंगा नदी ओलांडून उकळी शेत शिवारात नावेतून जावे लागत असल्याने दिनांक १८ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास परतीच्या प्रवासात ही नाव उलटून एका महिलेचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावातील शेतकऱ्यांना नेहमीच नावेतून प्रवास करावा लागत असल्याने त्यांच्याकडे आपत्ती निवारणाचे साहित्य देण्याची मागणी येथील शेतकरी सतत संबधितांकडे करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावातील शेतकऱ्यांना नावेतून प्रवास करावा लागू नये यासाठी कायमस्वरुपी तोडगा काढण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधित मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना शासनाने कोणती तातडीची मदत केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) यासाठी शेतकऱ्यांना पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.
(४) तालुका कृषी अधिकारी, मेहकर यांनी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेंतर्गत मदतीचा प्रस्ताव दिनांक १५ मे, २०२३ रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांना सादर केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कोरोना मृतांच्या वारसांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेबाबत**

**(२०) * ६४९२६ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल कांबळे (पुणे**

**कॅन्टोन्मेंट), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना महामारीच्या काळात कोरोनामुळे मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना राज्य शासनाकडून ५० हजार रुपये इतक्या सहाय्यक अनुदानाची रक्कम दीड वर्षानंतरही अद्याप मिळाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण मृतांपैकी अनुदानासाठी ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांपैकी सुमारे ८ हजार ५४२ अर्ज प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्ज मंजूरी नंतरही अद्यापही अनेक बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा झालेली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानित रक्कम तातडीने अदा करणेबाबत तसेच या विलंबास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) नाही, आत्तापर्यंत "कोविड-१९ या आजारामुळे निधन पावलेल्या व्यक्तींच्या निकट नातेवाईकास सानुग्रह सहाय्य "या योजनेखाली २,०९,७५३ इतक्या पात्र अर्जदारांना रुपये १०४८.७६ कोटी इतक्या सानुग्रह सहाय्याचे वाटप करण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मंजूर केल्यापैकी ८,१७३ इतक्या अर्जदारांचा बँक खाते तपशील बरोबर नसल्याने बँकेने प्रदान नाकारले आहे.

(४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे मार्फत संबंधित अर्जदारांशी संपर्क साधून त्यांचेकडून अद्ययावत बँक खाते तपशील प्राप्त करुन घेवून सानुग्रह सहाय्याची रक्कम त्यांना प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारांना नवीन बसेस पुरविण्याबाबत**

**(२१) * ६५३४७ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील राज्य परिवहनाच्या बसेस कमी असून बुलढाणा जिल्ह्यात एसटी महामंडळाच्या बसेसचे गेल्या दीड वर्षात ९९ अपघात झाल्याचे दिनांक २५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून यापैकी ६४ अपघात सन २०२२ मध्ये व ३५ अपघात सन २०२३ मध्ये झालेले असून या अपघातांमध्ये १० लोकांचा मृत्यू हा जुन्या व नादुरुस्त बसेसमुळे झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिंतूर (जि.परभणी) आगारात बसेसची संख्या अपुरी असून त्यातही आठ ते दहा गाड्या दररोज नादुरुस्तीच्या कारणाने आगारातच उभ्या असतात, गत ८ वर्षात जिंतूर आगारात एकही नवीन बस उपलब्ध करुन

देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अमरावती जिल्ह्यात ३६६ बसेस आणि ४५ शिवशाही बसेस असून यापैकी अनेक बसेस वाहतुकीसाठी धोकादायक असून त्यांची दुरवस्था झाली असून शिवशाही बसेस अस्वच्छ असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाकडून इलेक्ट्रिक बस पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, मलकापूर आगाराकरिता (जि.बुलढाणा) ४० इलेक्ट्रिक बस पुरवणे बाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) नुसार लोकप्रतिनिधी खामगांव यांनी दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास नवीन बसेस मिळण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे पत्राव्दारे तसेच लोकप्रतिनिधी, मलकापूर यांनी नवीन बसेस पुरविण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

रा.प. खामगांव आगारात एकूण ५४ बसेस उपलब्ध असून ४८ नियते आहेत. आगारास पुरेशा बसेस उपलब्ध आहेत. गेल्या दिड वर्षात रा.प. बुलढाणा विभागाच्या बसेसचे अपघात हे जुन्या व नादुरुस्त बसेसमुळे झालेले नसून इतर कारणांमुळे झाले आहे.

(२) नाही.

जिंतूर आगारास गत ८ वर्षामध्ये २२ नवीन वाहने व एमएम धातुमध्ये पुन:बांधणी केलेली २१ अशी एकूण ४३ वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(३) नाही,

अमरावती विभागात एकूण ३७८ बसेस असून त्यामध्ये ४५ शिवशाही बसेस आहेत. सदर बसेसची विभागीय कार्यशाळा/ आगार कार्यशाळा पातळीवर वाहनांची दैनंदिन कामे करुन नियतांवर देण्यात येतात. तसेच रा.प.बसेस स्वच्छतेसाठी बाहय संस्थेची निवड करण्यात आली असून त्यांचेमार्फत सर्व शिवशाही व इतर बसेस नियतावर जाण्यापूर्वी दररोज स्वच्छ करुन मार्गांवर पाठविण्यात येतात.

(४) व (५) होय.

(६) रा. प. महामंडळात ५१५० इलेक्ट्रीक बसेस जीसीसी मॉडेल अंतर्गत भाडेतत्वावर घेणेकरिता निविदा प्रक्रिया सुरु आहे.

रा.प. महामंडळास इलेक्ट्रीक बसेस प्राप्त झाल्यानंतर मलकापूर तसेच खामगाव आगारास इलेक्ट्रीक बसेस उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई सेंट्रल परिसरातील नाथानी हाईट्स या इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२२) * ६७४२७ श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डी प्रभाग, मुंबई सेंट्रल येथील नाथानी हाईट्स या इमारतीमध्ये महानगरपालिकेच्या अधिनियमांचे उल्लंघन करून विकासकाने पोडीयम पार्किंग आणि रिफ्यूजी एरिया कव्हर करून

जवळ जवळ २०० अनधिकृत गाळे तथा सदनिकांचे बांधकाम करून त्यांची विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अनधिकृत बांधकामाबाबत समाजसेवक श्री.रविंद्र काळसकर यांनी दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेतील संबधित विभागाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतीस बांधकाम पूर्णत्वाचा दाखला केव्हा देण्यात आला आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेचा इमारत व कारखाने विभाग, इमारत प्रस्ताव विभाग, अग्निशामन विभाग, संबंधित वार्ड ऑफिसर यांनी अनधिकृत बांधकामासंबंधी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या विकासक आणि सदर अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष करणारे अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नाथानी हाईट्स या इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी दिनांक ११.०६.२०१० रोजी अमान्यतेची सूचना (आय.ओ.डी.) देण्यात आली असून, दिनांक ०२.१२.२०११ रोजी बांधकाम आरंभ प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

तद्नंतर दिनांक ०७.०६.२०२१ रोजी सदर इमारतीच्या तळघर (पार्किंगकरिता) + तळमजला (पुनर्वसन घटक व्यावसायिक गाळे) + १ ला ते २ रा मजले (पुनर्वसन आणि विक्री घटक व्यावसायिक गाळे) + ३ रा ते ७ वा पार्किंग मजले + ८ वा स्टील्ट + ९ वा ते ३९ वा निवासी मजले (पुनर्वसन + म्हाडा घटक) + ४० वा ॲमिनीटी मजला + ४१ ते ७२ निवासी मजले (विक्री घटक) असे सुधारीत आराखडे मंजूर करण्यात आले होते.

तथापि, वास्तुविशारदाने प्रस्तावित केल्यानुसार पार्किंग टॉवरसह पोडीयम पार्किंग मजल्यावर (३ रा ते ५ वा मजला) व्यावसायिक पुनर्वसन व विक्री घटक गाळे अशा सुधारीत आराखड्यांना दिनांक ०१.१२.२०२१ रोजी मंजुरी देण्यात आली.

सद्य:स्थितीत दिनांक २५.१०.२०२२ रोजीच्या सुधारीत मंजुर आराखड्यानुसार प्रस्तावित इमारत, तळघर (पार्किंगकरिता) + तळमजला (पुनर्वसन घटक व्यावसायिक गाळे) + १ ला ते ५ वा मजले (पुनर्वसन आणि विक्री घटक व्यावसायिक गाळे) + ६ वा ते ७ वा पार्किंग मजले + ८ वा स्टील्ट + ९ वा ते ३९ वा निवासी मजले (पुनर्वसन + म्हाडा घटक) + ४० वा ॲमिनीटी मजला + ४१ ते ७२ निवासी मजले (विक्री घटक) + पार्किंग टॉवर अशी आहे.

(२) हे खरे आहे.
(३) सदर इमारतीस दिनांक ०३.०१.२०१७ रोजी तळघर + तळमजला + १ ला मजला (व्यावसायिक), दिनांक १३.०२.२०१७ रोजी २ रा मजला (व्यावसायिक) व दिनांक ३०.१०.२०१८ रोजी ३ रा मजला ते ७ वा मजला आणि ९ वा मजला ते ३८ वा मजला (पुनर्वसन घटक) याकरिता अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
(४) सदर इमारतीमध्ये सुधारीत मंजूर आराखड्याव्यतिरिक्त कोणतेही काम सुरु असल्याचे आढळून आले नाही, असे संबंधित तक्रारदारास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या रोख रक्कमेसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) * ६४५८५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत ७ वर्षापासून क्षमतेअभावी वसतिगृहाचा लाभ देता येत नसलेल्या मागसवर्गीय विद्यार्थांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या माध्यमातून दरवर्षी रुपये ६० हजार निर्वाह भत्ता देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुवातीची २ वर्षे वगळता गत ५ वर्षापासून या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला नाही, तसेच सदरहू योजनेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात गेल्या तीन वर्षांपासून निर्वाह भत्त्याची रक्कम जमा झाली नसल्याचे दिनांक ५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपलब्ध निधीतून किती विद्यार्थ्यांना ही आर्थिक मदत देता येईल याचे कोणतेही उद्दिष्ट समाजकल्याण आयुक्तालयाने ठरविले नसल्याने तसेच याबाबत एकत्रित माहिती आयुक्तालयाकडे उपलब्ध नसल्याने अनेक विद्यार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात हे अर्ज निकाली काढण्यासाठी प्रशिक्षित व कायमस्वरुपी अधिकारी उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०२० ते २०२३ पर्यंतच्या स्वाधार योजनेची रक्कम थकीत खात्यात वितरित करावी व पुणे जिल्ह्यातील अर्ज निकाली काढण्यासाठी कायमस्वरूपी प्रशिक्षित अधिकारी नेमावे अशीही मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यासंदर्भात नियोजनबद्ध योजना राबवून अधिकाधिक निधीची तरतूद करणे तसेच प्रशिक्षित अधिकारी नेमणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या परंतु प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, निर्वाह भत्ता व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली आहे. दिनांक १३ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये विहीत केल्यानुसार अनुज्ञेय रक्कम सबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते.
(२) व (३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत वर्षनिहाय उदिष्ट व लाभार्थी संख्या याबाबतचा वर्षनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वर्ष | लाभार्थी संख्या | |
|---|---|---|---|
| | | उद्दिष्ट | साध्य |
| १. | २०१७-१८ | २५००० | ९५०८ |
| २. | २०१८-१९ | २५००० | २०८५७ |
| ३. | २०१९-२० | २५००० | २४८६५ |
| ४. | २०२०-२१ | २५००० | २१६०५ |
| ५. | २०२१-२२ | २५००० | २३९३४ |
| ६. | २०२२-२३ | २५००० | २४७०४ |

(४) नाही.
(५) विद्यार्थी हक्क समिती, पुणे यांचेमार्फत दिनांक ३.४.२०२३ रोजीच्या आंदोलनाव्दारे प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे.
(६) सन २०२३-२४ या वर्षात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अंतर्गत रूपये १५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून आतापर्यंत या योजनेअंतर्गत रुपये ७५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, सदर योजनेच्या प्रलंबित दायित्वाबाबत आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडून करण्यात आलेल्या मागणीनुसार पुरवणी मागणीव्दारे अधिकची तरतूद करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित योग्य हमीभाव देण्याबाबत**

**(२४) * ६४६२६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल देशमुख (काटोल), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली),**

**श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कापसाच्या दरात घसरण होऊन कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून सरकीच्या दरात झालेल्या घसरणीमुळे कापसाच्या दरामध्ये क्विंटलमागे ५०० रुपयांची घट झाली असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरोरा (जि.चंद्रपूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिकार क्षेत्रात सात जिनिंग असून यातील काही जिनिंगमध्ये कापूस खरेदी करताना शेतमालाला अयोग्य भाव आणि तो घेऊन येणाऱ्या वाहनचालकाला लाच दिली जात असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक व पिळवणूक होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांची फसवणूक थांबविण्यासाठी सर्व जिनिंगमध्ये लिलाव पध्दतीने कापूस खरेदी करावा, अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबविण्याबाबत तसेच कापूस उत्पादकांना उत्पादन खर्चावर आधारीत योग्य हमीभाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) कापूस हंगाम २०२२-२३ करीता केंद्र शासनाने लांब धाग्याच्या कापसासाठी रुपये ६,३८०/- प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रुपये ६०८०/- प्रति क्विंटल इतका हमी दर जाहिर केलेला आहे. कापसाच्या गुणवत्तेनुसार व मागणीनुसार खुल्या बाजारात कापसाला दर प्राप्त होतात. माहे मार्च, २०२३ च्या दरम्यान सरकीच्या व रुईच्या दरातील चढ-उतारानुसार कापसाच्या दरात अंदाजे रुपये ३००/- ते रुपये ५००/- प्रती क्विंटल दरम्यान घट झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता लिलाव पध्दतीने कापूस खरेदी करावी याबाबत सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा यांच्याकडे दिनांक १७.०५.२०२३ रोजी मागणी करण्यात आली आहे.

(४) शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबविण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा यांच्या दिनांक २३.०५.२०२३ रोजीच्या संचालक मंडळ सभेत ठराव पारीत करण्यात आला असून, त्यानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात सध्या खुल्या बाजारपेठेत कापसाचे दर प्रति क्विंटल रुपये ६,९००/- ते रुपये ७,२५०/- इतके असून, सदर दर हे केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांच्याकडून हमी दराने कापूस खरेदी करण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील निवासी आणि अनिवासी जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती अतिधोकादायक असल्याबाबत**

**(२५) * ६४६१० डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे**

**पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे सर्वेक्षण केले असता पश्चिम उपनगरात ११४, शहरी भागात ३६ आणि पूर्व उपनगरातील ६६ इमारती अतिधोकादायक आढळल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने सदर इमारतींची सी-१, सी-२ आणि सी-३ अशी वर्गवारी करून त्यानुसार धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना इमारत रिकामी करण्याबाबत दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास नोटीसा दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने संकेतस्थळावर अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर करण्यात येऊनही काही इमारतींमध्ये नागरिक वास्तव्यास असल्याचे तसेच त्यांचे अद्याप स्थलांतर केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अतिधोकादायक इमारतींचे दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास पाणी बंद करण्यात आले असूनही अद्याप रहिवाशांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत तातडीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सी-१ प्रवर्गातील (अत्यंत धोकादायक व मोडकळीस आलेल्या) इमारतींचे सर्वेक्षण केले असता पश्चिम उपनगरात १२६, शहरी भागात ३५ व पूर्व उपनगरात ६५ इमारती अतिधोकादायक आढळून आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने घोषित केलेल्या सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक इमारतींच्या अधिसूचित यादीतील एकूण २२६ इमारतींपैकी १०४ इमारतीतील रहिवाशांनी मा. न्यायालयाकडून इमारत रिकामी न करण्याबाबतचे स्थगिती आदेश प्राप्त केले आहेत व ११ इमारतीतील रहिवाशांनी संरचनात्मक परिक्षणाबाबत आक्षेप घेतल्यामुळे सदर प्रकरणे तांत्रिक सल्लागार समितीकडे निर्णयास्तव पाठविण्यात आली आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक व असुरक्षित इमारतींबाबतच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रहिवाशांना इमारत रिकामी करण्यासाठी वेळोवेळी नोटीसा देऊन स्थानिक पोलीसांच्या सहाय्याने सदर इमारतींचे विद्युत व पाणी बंद करण्यात येत असून इमारती रिकाम्या करण्याची कारवाई सुरु आहे.

तसेच, मा. न्यायालयात स्थगिती आदेश प्राप्त केलेल्या अतिधोकादायक इमारतींबाबत स्थगिती आदेश उठविण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या विधी विभागाच्या सहाय्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेमध्ये विविध कामांमध्ये गैरव्यवहार व नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक (कॅग) यांनी ठेवल्याबाबत

**(२६) * ६४९२० ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.झीशान सिद्दिकी**

**(वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेमध्ये विविध कामांमध्ये माहे नोव्हेंबर, २०१९ ते माहे ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत झालेल्या रुपये १२ हजार कोटींच्या कामात निधीचा गैरव्यवहार व कंत्राट देताना नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक (कॅग) यांनी ठेवला असल्याचे माहे जून २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची विशेष चौकशी समितीमार्फत (SIT) चौकशी करावी व एफआयआर दाखल करावा अशी मागणी करणारे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१९ ते माहे जून २०२२ या कालावधीत महानगरपालिकेने रुपये २१४ कोटींपेक्षा अधिक रकमेच्या कामांचे निविदा न मागवताच वाटप केले तसेच रुपये ४ हजार ७५६ कोटी रुपयांची कामे ६४ कंत्राटदारांना देताना त्यांच्याबरोबर करारच करण्यात आला नव्हता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, करार न केल्यामुळे महानगरपालिकेला कंत्राटदाराविरुध्द कायदेशीर कारवाईच करता येत नसल्याने रुपये ३,३५६ कोटींच्या १३ कामात थर्ड पार्टी ऑडिटर नियुक्त करण्यात आला नव्हता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व सदर चौकशीअन्वये उक्त प्रकरणाची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील विशेष चौकशी समिती (SIT) मार्फत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) याबाबत महालेखापाल कार्यालयाने त्यांच्या विशेष लेखापरिक्षण अहवालात आक्षेप उपस्थित केला आहे.

(५) सदर प्रकरणी दिनांक २१ जून, २०२३ रोजी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती (SIT) गठीत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.